# - कागदपत्र पडताळणीचे अनुषंगाने उमेदवारांसाठी सूचना -

**दि.१९.०६.२०२६ रोजी प्रसिध्द केलेल्या यादीतील उमेदवारांनी सोमवार दि.२२.०६.२०२६ रोजी वेळी खालील मूळ प्रमाणपत्रे व १ साक्षांकित संचासह आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, कंपाऊंड, पी. डीमेलो रोडे, मुंबई ४०० ००१ येथे उपस्थित राहावे.**

१. वैद्यकीय अधिकारी पदासाठी केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रत

२. जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/शालांत परिक्षाउत्तीर्ण दाखला प्रमाणपत्र

३. Domicile / अधिवास प्रमाणपत्र

४. एमबीबीस च्या सर्व वर्षाच्या मुळ (original) गुणपत्रिका व मूळ पदवी प्रमाणपत्र व पदव्युत्तर पदविका/पदवी चे प्रमाणपत्र

५. राखीव प्रवर्गातून अर्ज केला असल्यास जात व जात वैधता प्रमाणपत्र.

६. राखीव प्रवर्गातून अर्ज केल्यास लागू असेल त्या प्रवर्गास शासकीय नियमानुसार आवश्यक असलेले Non-Creamy-Layer प्रमाणपत्र.

७. दिव्यांग कोट्यातून अर्ज केल्यास O.L.-One Leg (४०% to ५०% disability will be able to walk using walking aid, dominant extremity not involved.) अश्या प्रकारच्या दिव्यांग स्पष्टपणे नमूद केलेले सक्षम प्राधिकाऱ्याचे ONLINE पद्धतीने निर्गमित केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.

८. उमेदवाराने खेळाडू कोटयातून अर्ज केल्यास शा.नि.१-०७-२०१६/१८-०८-२१/३०-०६-२०२२/०१-०७-२०१६ मधील सर्वसाधारण अर्हता तसेच ४(V) नुसार अर्जासोबत विभागीय उपसंचालक यांनी क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केले प्रमाणपत्र आवश्यक.

९. अनुभव- जाहीरातीत नमूद केल्याचे शासकीय/निम शासकीय संस्थेमध्ये काम केल्याबाबतचे स्वाक्षरीत व मूळ शिक्क्याचे प्रमाणपत्र. (जाहिरातीचा अंतिम दिनांक ३१.०३.२०२६ पर्यन्तचा ग्राहय धरण्यात येईल)

१०. अर्ज करतेळी अपलोड केलेले सर्व मुळ कागदपत्रे व त्यांच्या साक्षांकीत प्रती

११. अर्जदारचे फोटोसह असणारे एक ओळखपत्र (आधार/पासपोर्ट/पॅनकार्ड/लायसन्स

१२. गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनी आयुक्तालयास मुळ प्रमाणपत्रांसह (केवळ छायांकित प्रती ग्राहय नाहीत) व्यक्तीशः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तथापि खाली नमूद कारणांसाठी उमेदवाराने प्राधिकारपत्र दिलेल्या व्यक्तीस कागदपत्र पडताळणीकरीता उपस्थित राहता येईल.

अ. गर्भवती श्री उमेदवार ज्यांना प्रवास करण्यास अनुमती नाही (परंतु यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे किंवा त्यांनी Counter Sign केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे)

ब. उमेदवार स्वतः आंतररुग्ण म्हणून रुग्णालयात दाखल असेल तर (परंतु या साठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे किया त्यांनी Counter Sign केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.)

आपण नमूद केलेल्या दिवशी व नमुद वेळेत अथवा उपरोक्त (१२) नुसार प्रतिनिधी उपस्थित न राहील्यास नियुक्तीसाठी त्यांची निवड केली जाणार नाही व त्यांना त्याबाबतचा कोणताही हक्क सांगता येणार नाही.